# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

विषय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०१/२०१८/०२१५

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : २५.०९.२०१७ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : १७.१०.२०१७ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : १२.०१.२०१८ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : ०९.०२.२०१८ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**
**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**<u>अपील क्र. ०१/२०१८</u>**

**अपीलकर्ता :** श्रीमती जयश्री ज्ञानदेव पाटील

विरुदध

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक २५.०९.२०१८ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत अर्ज केला. प्रतिवादी यांनी त्यांचे पत्र दिनांक १७/१०/२०१७ नुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक १२/०१/२०१८ ला वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक १६/०१/२०१८ ला नोटिस पाठवून अपिल सुनावनीची संधी दिली व दिनांक ०५/०२/२०१८ ला अपिलार्थी व प्रतिवादी यांना आपले समक्ष बाजू मांडण्याची संधी दिली. अपिलार्थी गैरहजर होते व माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहून आपले मौखिक म्हणणे अपिलीय अधिकारी यांचे समक्ष सादर केले.

अपिलार्थी यांना नोटीस प्राप्त झाली नाही त्यांची नोटीस अपूर्ण पत्ता या सबबीने कार्यालयास परत आले.

३) माहिती अर्ज लक्षपूर्वक गृहित धरुन व त्याला प्रतिवादी यांचे आदेश/उत्तर व या अपिलातील मुद्यांना धरुन नास्तितील पुराव्याच्या आधारे अपिल निकाली काढण्यात येत आहे.-

**मागितलेली माहिती:-**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग मुंबई सदर कार्यालयास मा.सहाय्यक अभियंता कार्यालय सांगली शेतीला वीज कनेक्शन 06.04.2016 रोजी कोटेशन भरलेले असताना सुध्दा सदर कार्यालय वीज कनेक्शन देण्यास टाळाटाळ करीत आहे, याबाबत आपणाकडे दि. 28.02.2017 रोजी तक्रारीअर्ज दिला होता. त्या तक्रारी अर्जास अनुसरुन आपल्या कार्यालयाकडून केलेल्या कारवाईच्या आदेशाची नक्कल मिळावी.

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

2. महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाने शेतक-याकडून पोलसाठी डिपॉझिटसाठी ज्याची अनामत रक्कम भरुन घेतलेली रक्कम परत मिळण्याबाबत देण्याबाबतची कोर्टाकडून आदेश दिला आहे त्या आदेशाची नक्कल मिळावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

अपीलकर्ता याच्या मुददा क्र. १ ला उत्तर: दिनांक २८.०२.२०१७ रोजीचा अर्ज महावितरण कंपनीला या कार्यालयाच्या दि. २९.०३.२०१७ रोजीच्या पत्रासोबत आवश्यक कार्यवाहीकरिता पाठविण्यात आलेला आहे (सोबत प्रत जोडली आहे).

अपीलकर्ता याच्या मुददा क्र. २ ला उत्तर: सदर माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले आहे.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ व २ ची माहिती अद्याप न मिळाल्याने.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांचे दि. २८.०२.२०१८ च्या पत्राला अनुसरून जी कार्यलयाकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे ती उपलब्ध करून दिली आहे. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याविषयी कळविले आहे. करिता सदरहू अपिल हे प्रथमदर्शनी गुणवत्ताविहीन असल्याचे दिसून येते करिता अपिल खारिज करण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

## निर्णय

१) अपिलार्थी यांची अपिल खारिज करण्यात येत आहे.

9.2.18

**(अनिलकुमार उके)**

**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**

प्रति,

श्रीमती जयश्री ज्ञानदेव पाटील,

मु.पो. सांगलवाडी,

तालुका - मिरज, जिल्हा - सांगली.

पिन नं. ४१६ ४१६.

प्रतीलिपी- जनमाहिती अधिकारी, मविनिआ यांना निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता रवाना.

9.2.18

**(अनिलकुमार उके)**

**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपीलीय अधिकारी.**